९५५

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. २१६/बैठक/२८मार्च/२०२३/५४६ दिनांक : 11/4/23

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३ व २८/०२/२०२३ रोजीची क्रमांक **६९वी बैठक मंगळवार, दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा.** पुढे चालु ठेवण्यात आली असून, सदरील बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्य प्रणालीद्वारे), डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. (दूरदृष्य प्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब नोंद घेण्यात आली.

डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. सुनिल लिलानी, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व श्री. कुमावत प्रदीप जानकीराम, सहा. समन्वयक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई हे संबंधित संचालनालयाच्या वतीने बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील खालील नमूद विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठक वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १. | २८/०३/२०२३ | दुपारी १२:०० वा | तंत्र शिक्षण | B-Engieneering/B-Tech., B-Archtiecture, B-HMCT, M-Engineering/M-Tech., MBA/MMS, MCA, M-Architecture, DSE (Direct Second Year Engineering), DSP (Direct Second Year Pharmacy) व B - Design |
| | | दुपारी ०२:३० वा. | उच्च शिक्षण | LLB-३, LLB-५ (Integrated), M.Ed., M.P.Ed., B.Ed.व B.P.Ed. |
| | | दुपारी ०३:३० वा | वैद्यकीय शिक्षण | PGM, PGD व MBBS |
| | | सांय. ०४:३० वा | कला शिक्षण | B - Fine Arts |

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, २) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील सादर केलेल्या संबंधित महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवालांचे अवलोकन करण्यात आले व तद्नुषंगाने निर्देश देण्यात आले,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/१२/२०२२ व ३०/०१/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.

३) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचे अधिकार देखील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) व महानगरपालिका अखत्यारितीतील महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(क) नुसार " प्रक्रिया शुल्क " अदा करणे अनुज्ञेय राहील व तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या दिनांक २५/०३/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच या अनुषंगाने १) श्री. महेंन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक् प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई २) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, ३) श्री. सिध्देश नर, परीक्षा समन्वयक (वैद्यकीय / आयुष शिक्षण), राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ४) श्री. जयंत तुकाराम आवळे, संबंधित लिपिक यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. उर्वरित अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित उपसमितीने कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

५) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील LLB-३, LLB-५ (Integrated), M.Ed., M.P.Ed., B.Ed.व B.P.Ed.या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या तपासणी अहवालासह "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" अधिनियम २०१५ मधील विहित तरतूदींनुसार प्राधिकरणास सादर केलेला नसल्यामुळे सध्या सदरील प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर व प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

६) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB, ५) Orphan व ६) अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जांगावर व ७) व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. याकरिता प्राधिकरणाचे मा. सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली १) डॉ. पी.एच. शिनगारे, माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई -सदस्य, २) डॉ. दिपक राऊत, सल्लागार, आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, - सदस्य, व ३) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई - समन्वयक यांची उपसमिती गठित करण्यात येत आहे. प्रस्तूत प्रकरणी वरील प्रमाणे गठित उपसमितीने तपासणी/छाननी करुन स्वयंस्पष्ट अहवाल ०२ महिन्यामध्ये प्राधिकरणास सादर करावा.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

७) अधिनियम २०१५ मधील तरतदूंच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम **(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय )** प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

८) तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण (पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रम वगळून) व कला शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने "प्रपत्र - अ" मधील नमूद विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी समितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि संबंधीत उपसमितीद्वारे सादर होणाऱ्या अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

९) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

१०) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास PWD संवर्गातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची तपासणी १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीने करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

११) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

१२) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी, तथापि ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी १% निवडक पध्दतीने प्राधिकरण स्तरावर तपासणी/छाननी प्रक्रिया पुर्ण झालेली नाही, अशा अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांना संबंधीत उपसमितीद्वारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयांनतर प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१५९

**विषय क्रमांक २:** **मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ३(घ) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (२०१७-१८ मधील ०२ एल.एल.बी. अभ्यासक्रमाची प्रकरणे) मध्ये ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणास विलंबाने सादर केल्याप्रकरणी दंड आकारण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी दिनांक १६ व १७ मार्च २०२३ रोजी झालेल्या बैठकीस अनुसरुन निर्णय घेणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तामधील विषय सूची क्रमांक ४(घ) अन्वये ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी "प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव" विहित कालावधीमध्ये सादर न केल्याप्रकरणी रु. १ लाख दंड आकारणी करण्यात आलेला आहे, तथापि या संदर्भात महाविद्यालयांनी सादर केलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व संबंधित संचालक यांच्या समवेत दिनांक १६/०३/२०२३ व १७/०३/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आलेली आहे. याबाबत संबंधितांना प्राधिकरणाच्या दिनांक ६/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

२) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव विलंबाने सादर केला अशा महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक १४, १५, १६, २१ व २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी अभ्यासक्रम निहाय महाविद्यालयांची सुनावणी घेण्यात आलेली आहे व संबंधीत महाविद्यायांनी सादर केलेल्या निवेदन/माहितीस अनुसरुन प्राधिकरणाने दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीमधील निर्णय बाब क्रमांक २ अन्वये सदरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधितांना मान्यता पत्रे निर्गमित करण्यात यावी.

३) प्रस्तूत प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांनी प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दिनांक १६/०३/२०२३ व १७/०३/२०२३ रोजी उपस्थिती दर्शविली व / किंवा समर्पक खुलासा सादर केला, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तामधील विषय सूची क्रमांक ४(घ) अन्वये आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम क्षमापित करण्यात येत असून सदरील व्यावसायिक महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास **(प्रपत्र-ब)** संबंधित संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी जी महाविद्यालये सदरील सुनावणीस गैरहजर होती तथा समर्पक खुलासा सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या उक्त निर्णयाबाबत काही म्हणणे नाही, असे समजून दंडाची कारवाई करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले **(प्रपत्र-क)**.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ३: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) केे.जे. सौमय्या मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटर, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष पदवी व्यावसायिक वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जैस्वार वंदना रामनवल यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे, मुंबई खंडपीठ, मुंबई येथील याचिका क्रमांक ५६८/२०२२ मधील दिनांक ९/०१/२०२३ रोजीचे न्यायालयीन आदेश.

के.जे. सौमय्या मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटर, सायन, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जैस्वार वंदना रामनवल यांचा प्रवेश नीट-युजी-२०२० च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या द्वितिय प्रवेश फेरीमधून एस.स्सी. संवर्गातून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत् झाला असून, सदरील प्रक्रिये दरम्यान विद्यार्थीनीकडे जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नव्हते व तद्नुषंगाने संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी कु. जैस्वार वंदना रामनवल यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी दर्शविल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नव्हती.

या संदर्भात के.जे. सौमय्या मेडिकल कॉलेज ॲण्ड रिसर्च सेंटर, सायन, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जैस्वार वंदना रामनवल यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी याचिका क्रमांक ५६८/२०२२ मधील दिनांक ९/१/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशामधील परिच्छेद क्रमांक १९ मधील निर्णयास अनुसरुन सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ख) पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दानिश अनवर अबरार अहमद या विद्यार्थ्याने दाखल केलेली याचिका क्र.२०१६/२०२२ मधील मा.न्यायालयाचे आदेश.

पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दानिश अनवर अबरार अहमद या विद्यार्थ्याने दाखल केलेली याचिका क्र.२०१६/२०२२ मधील मा.न्यायालयाचे आदेश प्राप्त झाले आहेत.

२. सदर प्रकरणी तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दि.२३/०३/२०२१ रोजीचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विनाअनुदानित संस्थामधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमातील कु. दानिश अनवर अबरार अहमद या प्रवेशित विद्यार्थ्याचा प्रवेश ओबीसी प्रवर्गातून खुल्या प्रवर्गात परिवर्तीत करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच, पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या महाविद्यालयाचे दि.२६/०४/२०२१ रोजीच्या पुनर्विलोकन याचिका दाखल केली आहे.

३. त्याअनुषंगाने, पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या महाविद्यालयास दि.२६/०४/२०२१ रोजी सुनावणी देण्यात आली. तसेच, दि.२२/१०/२०२१ रोजीचे सुनावणी निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर सुनावणीच्या आदेशान्वये महाविद्यालयाची पुनर्विलोकन याचिका फेटाळण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

४. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. २ ड मधील निर्णयाच्या अनुषंगाने, पुनर्विलोकन याचिकांचे सुनावणी निर्णयाबाबत महाविद्यालयांच्या निवेदनांच्या अनुषंगाने, महाविद्यालयाने सादर केलेली विद्यार्थ्यांच्या त्रुटींची कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण सादर करतील असा निर्णय घेण्यात आला.

५. त्याअनुषंगाने, दि.१७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्राने संबंधीत संचालकांकडून कालबद्ध पडताळणी कार्यक्रम आयोजित करुन, पत्रात नमूद केलेल्या SoP प्रमाणे अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २३/११/२०२२, ६/१२/२०२२, ७/१२/२०२२ व दि.२१/१२/२०२२ रोजींच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

*"The candidate has verified the Proforma H for CVC at the time of admission. The category for admission verified by FC was OBC. On latter stages, candidate failed to obtain and submit CVC. Hence, candidate is only eligible to be admitted in open category by paying the difference fee Rs २०० (towards conversion). However, the candidate was admitted by the institute against the vacancy (Seat type - ACAP) through the merit list prepared from the applications received at the institute, as per the process specified by CET cell. Under such circumstances, as candidate has not allotted/admitted the category seat and candidate is eligible to get admission in open category. The candidate is eligible to take admission to the Course in the unreserved category as well (४९.६७%). The category of admission should be converted to Open and candidate should be asked to pay the difference fee Rs २००. The candidate has been admitted in ACAP without affecting the admission of any candidate and is not taking any benefit of caste based reservation for admission. Hence, recommended."*

६. दरम्यान कु. दानिश अनवर अबरार अहमद या विद्यार्थ्याने दाखल केलेली याचिका क्र.२०१६/२०२२ मधील मा. न्यायालयाचे दि.१०/०२/२०२३ रोजीचे, "संबंधीत याचिकाकर्त्याने दि.२२/०२/२०२३ रोजी प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात निवेदन सादर करण्याचे" आदेश आहेत. त्याअनुषंगाने, कु. दानिश अनवर अबरार अहमद या विद्यार्थ्याने दि.१/०३/२०२३ रोजीचे विषयांकित निवेदन सादर केले आहे.

७. त्याअनुषंगाने, संबंधीत याचिकाकर्त्याच्या दि.१६/०३/२०२३ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सदर सुनावणी आदेशाच्या अनुषंगाने, संबंधीत महाविद्यालयाने, दि.१८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विद्यार्थ्याच्या अर्जासह प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

९. उक्त नमूद वस्तूस्थिती विचारात घेता पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दानिश अनवर अबरार अहमद यांच्या प्रवेश मान्यतेबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालाद्वारे केलेल्या शिफारसीनुसार सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमांस इतर सामाईक प्रवेश परिक्षांद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमांस इतर सामाईक प्रवेश परिक्षांद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे **<u>(प्रपत्र-ड)</u>**.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) **<u>श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे या अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया अद्याप पुर्ण झालेली नाही. या संदर्भात महाविद्यालयाने दिनांक १६/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विधी ३ वर्षे या अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केला होता.

२. उक्त प्रकरणी मा. अध्यक्ष, प्रनिप्रा यांच्या निर्देशानुसार दि.२३/०३/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली असून सदरील पुनर्विलोकन याचिका रद्द करण्यात आलेला आहे व तद्नुषंगाने दिनांक २४/०६/२०२२ रोजीचा निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

३. सदर महाविद्यालयाने दिनांक ०३/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणाद्वारे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेचे पत्र मिळण्याबाबत विनंती केली आहे. सोबत संचालकांचा दिनांक १९/०१/२०२३ रोजीचा पडताळणी अहवाल सादर केला आहे व आवश्यक प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला आहे.

४. उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्षे अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रस्ताव मान्यतेप्रकरणी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांनी दिलेल्या निर्देशानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ज्या महाविद्यालयांनी संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेल्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव अद्याप प्राधिकरणांस सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी आयोजित बैठकिस उपरोक्त महाविद्यालय उपस्थित होते.

५. त्याअनुषंगाने, श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षांच्या विधी ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार ६० पैंकी त्रुटी दर्शविलेल्या ०३ प्रवेश ना मंजुर करण्यात येत असून, रद्द झालेल्या ०२ प्रवेशांची नोंद घेण्यात आली व उर्वरित ५५ प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ङ) **<u>दयानंद लॉ कॉलेज, सोलापुर येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

दयानंद लॉ कॉलेज, सोलापुर यांचे दि.१९/१०/२०२२ रोजीचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादया मिळण्याबाबत पुनर्विलोकन याचिका सादर केली होती.

२. दयानंद लॉ कॉलेज, सोलापुर या महाविद्यालयाने विषयांकित शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी ३ वर्षे अभ्यासक्रमाचे प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केला आहे व आवश्यक प्रक्रिया शुल्काचा भरणा केलेला आहे.

३. उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रस्ताव मान्यतेप्रकरणी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांनी दिलेल्या निर्देशानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ज्या महाविद्यालयांनी संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेल्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव अद्याप प्राधिकरणांस

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीच्या आयोजित बैठकिस उपरोक्त महाविद्यालय उपस्थित होते.

४. त्याअनुषंगाने दयानंद लॉ कॉलेज, सोलापुर या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षांच्या विधी ३ अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अहवालानुसार १२० प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(च) **महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या ८ व ९वा मजला खरेदीच्या प्रलंबित उर्वरित रक्कम रु. २ कोटी मधील प्रत्येकी रु. ७५ लाख असे दोन्ही कार्यालयांचे मिळून रु. १ कोटी ५० लाख प्रदान करण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयाच्या खरेदी प्रकरणी कार्यालयाने सादर केलेल्या दिनांक ०३/०३/२०२३ रोजीच्या टिपणीमधील नमूद प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या गोपनीय कामकाजासाठी अतिरिक्त जागेची आवश्यकता असल्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्या संदर्भात या कार्यालयाच्या ईमारतीमधील रिक्त असलेल्या जागा भाडे तत्वावर घेण्याबाबत सविस्तर अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(छ) **नुरजहाँ बेगम सलाम एहमद वुमन्स कॉलेज ऑफ लॉ, बुरांडा, ता. - मोरगाव, जिल्हा - यवतमाळ येथील शैक्षणिक वष्र २०२२-२३ मधील व्यावसायिक विधी-५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित ०९ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत.**

नुरजहाँ बेगम सलाम एहमद वुमन्स कॉलेज ऑफ लॉ, बुरांडा, ता. - मोरगाव, जिल्हा - यवतमाळ येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक विधी-५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित ०९ विद्यार्थी - १) सानिया शेख अल्ताब हुसेन, २) अरिबा इब्तेसाम अब्दुल रशीद, ३) अर्जीना शेख इमामुद्दिन, ४) नंदरे प्रियल राजु, ५) नंदारे पायल राजु, ६) बेग रामशा आसिफ, ७) शिफा मोदम्मद आबिद, ८) तेलंग तृप्ती शुक्राचारी व ९) प्रियांका मुकेश अग्रवाल यांच्या प्रवेश प्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष येथील दिनांक २७/०३/२०२३ रोजीच्या प्रस्तावास अनुसरुन संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेश निश्चिती प्रकरणी व प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी तपासणी/छाननी करुन अहवाल प्राधिकरणास सादर करावा, तद्नंतर प्रस्तूत प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात येईल.

(ज) **महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित कु. यश प्रशांत पालवे यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी**

महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित कु. यश प्रशांत पालवे यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद येथील याचिका क्रमांक २५७९/२०२३ मधील दिनांक १७/०३/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये प्रस्तूत प्रकरणी नियमानुसार निर्णय घेण्याचे निर्देश होते. याबाबत

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांच्या दिनांक ४/०२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार कु. यश प्रशांत पालवे या विद्यार्थ्यास पात्र दर्शविण्यात आलेले असल्याने सदरील विद्यार्थ्याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(झ) <u>विवा कॉलेज ऑफ फार्मसी, विरार, जिल्हा - ठाणे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कु. आदिती अनिल मोरे यांचा प्रथम वर्ष बी. फार्म. अभ्यासक्रमाच्या प्रवेश रद्द बाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई व महाविद्यालय यांची आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या समवेत अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर बैठक आयोजित करुन त्याचा अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(ञ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

तसेच आज रोजी घेण्यात आलेली प्राधिकरणाची क्रमांक ६९वी बैठक मंगळवार, दिनांक २७/०४/२०२३ रोजी ठिक दुपारी १२:३० वा. पुन्हा पुढे घेण्यात येईल.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई, २) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) संचालनालय, कला शिक्षण, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : ११/४/२३